# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १२/०९/२०२४ (गुरूवार) सकाळ

---

### काटोल हद्दीत अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

दि. ११/०९/२०२४ रोजी पोलीस ठाणे काटोल हद्दीतील मौजा डोंगरगाव येथील पारधी बेडा येथे मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून आजूबाजूचे परीसरात विक्री करणार असल्याची गोपनीय खबर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाल्याने पोस्टे काटोल हद्दीतील मौजा डोंगरगाव येथील पारधी बेडा येथे सुरू असलेल्या अवैधरीत्या गावठी पद्धतीने हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या एकूण ४ इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या गावठी पद्धतीने हातभट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे **०४ महिला आरोपी** यांचे ताब्यातून मोहाफुल सडवा ४६०० लिटर एकूण किंमती ९२०००/—रू चा तसेच मोहाफुल उकडता रासायनिक सडवा ३०० लीटर किंमती ६०००/—रु तसेच एकून मोहाफुल गावठी दारू १७० लिटर एकूण किंमती ८५००/—रू ची तसेच मोहाफुल दारू काढण्याचे इतर साहित्य ड्रम, लाकूड इत्यादी मिळून असा एकुण ४ गुन्ह्यात १,३६,४००/— रु चे मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे काटोल यांचे ताब्यात देण्यात आले. त्याचे विरुद्ध कलम ६५(बी), (सी), (ई), (फ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.


सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनी श्री किशोर शेरकी, सपोनी. श्री आशिषसिंग ठाकुर, पोउपनि श्री बट्टुलाल पांडे, सफौ. मिलिंद नांदुरकर, विनोद काळे, पोहवा ईकबाल शेख, रोशन काळे, रोहन डाखोरे, राजेंद्र रेवतकर, प्रमोद भोयर, पोना वीरेंद्र नरड, पोशी धोंडुतात्या देवकत्ते, अभिषेक देशमुख, मपोहवा नितु रामटेके, मपोहवा कविता बछले, चापोहवा अमोल कुथे, चापोहवा मुकेश शुक्ला, चापोशी आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.

# <u>जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई</u>

दि. ११/०८/२०२४ रोजीचे ०४/३० वा. ते ०५/३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा हद्दित पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, भंडारा मार्गे नागपुरकडे रबडीवाला फाटा, मौदा वरुन अवैद्यरीत्या विनापरवाना छोट्या मालवाहु वाहनांतुन जनावरांची वाहतुक होणार आहे. अशा माहितीवरुन रबडीवाला फाटा, मौदा शिवारातील रोडवर नाकाबंदी केली असता, नाकाबंदी स्थळापासून काही अंतरावर १) टाटा योद्धा गाडी क्र. MH-27/BX-3457 २) महेन्द्रा बोलेरो पिकअप क्र. MH-49/AT-6817 चे चालकाने आपले वाहन थांबवुन फरार झाले. दोन्ही मालवाहु वाहनाचे मागील डाल्यात १४ गायी व ९ गोऱ्हे असे एकुण २३ गोवंशीय जनावरांना अत्यंत निर्दयतेने वाहनात कोंबुन आखुड दोरखंडाने बांधुन जनावरांची चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तली करीता वाहतुक करतांना मिळुन आल्याने १) टाटा योद्धा गाडी क्र. MH-27/BX-3457 कि. ५,००,०००/—रु. २) महेन्द्रा बोलेरो पिकअप क्र. MH-49/AT-6817 किंमती ५,००,०००/—रु. ३) २३ गोवंशीय जनावरे किंमती २,३०,०००/—रु. असा एकुण १२,३०,०००/—रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर वाहनातील गोवंशीय जनावरांना योग्य व्यवस्थापनार्थ ज्ञान फान्डेशन गौरक्षण केन्द्र, खरबी, जि. भंडारा येथे दाखल करण्यात आलेले आहे. गुन्ह्यातील दोन्ही आरोपी फरार वाहन चालक व मालका विरुद्ध दोन गुन्हे कलम ११(१)(d), ११(१)e, ११(१) (f) प्राणी छळ प्रतिबंधक अधिनीयम १९६० सहकलम ५(A) (१),९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनीयम १९७६ अन्वये नोंद करण्यात आलेले आहे. मौदा पोलीस सदर आरोपीतांचा शोध घेत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. श्री. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान यांचे मार्गदर्शनात श्री. प्रमोद घोंगे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन मौदा यांचे सोबत पोलीस स्टॉफ पोउपनि महेश बोथले, पोहवा संदीप कडु, गणेश मुदमाळी, रुपेश महादुले, पोना दिपक दरोडे यांनी केली आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर